श्री भगवंत शिक्षण प्रसारक मंडळ, मांडेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर संचलित नविन माध्यमिक प्रशाला, मांडेगाव, ता.बार्शी, जि.सालापूर या मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक शाळेचे, बेलगांव, ता.बार्शी, जि.सोलापूर येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३०१९/प्र.क्र.४६२/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा :-</u>

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

<u>संदर्भ:-</u> विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र.शिउसं/माध्य-३०१/ पुवि/ स्थलांतर/नविन माध्यमिक प्रशाला/२०१९-३/२०१४-१५/९८७/८८,
दिनांक १ एप्रिल, २०१५ चे पत्र.

<u>प्रस्तावना :-</u>

श्री भगवंत शिक्षण प्रसारक मंडळ, मांडेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर संचलित नविन माध्यमिक प्रशाला, मांडेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर या अनुदानित माध्यमिक शाळेचे, बेलगांव, ता.बार्शी, जि.सोलापूर येथे स्थलांतर करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त शाळेचे सध्याच्या भाडयाच्या अपुऱ्या इमारतीमधून स्वयंपूर्ण इमारतीत स्थलांतर प्रस्तावित आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी स्थलांतर करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे :-

१) शाळा इमारतीचे प्लास्टरींगचे काम तसेच स्वच्छतागृहांवर छप्पर घालण्याचे काम पूर्ण करणे आवश्यक राहील.

२) स्थलांतरीत शाळेबाबत किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

३) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

४) शाळेबाबत मूळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही.

५) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत आहे, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

६) शाळा स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी अथवा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास, स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही ४ आठवडयांत पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१९२००२७९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.09.13 19:13:12 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर रोड, कॅम्प रोड, पुणे- ४११ ००१.
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर.
४) अध्यक्ष, श्री भगवंत शिक्षण प्रसारक मंडळ, मांडेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर.
५) निवडनस्ती (एसएम-१).